80370171207

**MRS. VIDYULL ATA K. TATED**
M.Com.,LL.B. Advocate
206, Damodar Chambers,
Behind Shivaji Garden
Near, C.B.S., Kanhere Wadi,
Nashik - 422 002.

Wsce

S No 8or/1/2/5 to 7

Plot No 1C + 2A

Upp

Shree Tirumala Paramount Apt

395/6986
Monday,December 11 ,2017
12:06 PM

**पावती**

Original/Duplicate
नोंदणी क्रं. :39म
Regn.:39M

पावती क्रं.: 9069 दिनांक: 11/12/2017

गावाचे नाव: **नाशिक शहर**

दस्तऐवजाचा अनुक्रमांक: **नसन5-6986-2017**

दस्तऐवजाचा प्रकार : **जनरल पॉवर ऑफ अॅटर्नी**

सादर करणाऱ्याचे नाव: **रुंगठा होम्स एल एल पी तर्फे भागीदार श्री अखिल ललित रुंगठा**

| | |
|---|---|
| नोंदणी फी | रु. 10[illegible] |
| दस्त हाताळणी फी | रु. 480.00 |
| पृष्ठांची संख्या: 24 | |
| एकूण: | रु. 580.00 |

आपणास मूळ दस्त, थंबनेल प्रिंट, सूची-२ अंदाजे 12:11 PM ह्या वेळेस मिळेल.

सह. दुय्यम निबंधक वर्ग-२ नाशिक-५.

बाजार मूल्य: रु.1 /-
मोबदला रु.1/-
भरलेले मुद्रांक शुल्क : रु.500/-

1) देयकाचा प्रकार: By Cash रक्कम: रु 100/-
2) देयकाचा प्रकार: By Cash रक्कम: रु 480/-

मूळ दस्तऐवज परत केला.

भारतीय गैर न्यायिक

भारत INDIA

रु. 500 FIVE HUNDRED RUPEES

पाँच सौ रुपये

सत्यमेव जयते

Rs. 500

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA  2016  AC 798995

अ.नं. 90307 दि 24 NOV. 2017 कि.रु. 500/- ज.मु.पत्र

नाव :- सुमंगल होम्स मल्टी प्रा.लि.

पत्ता :- पेठेनगर रोड, नाशिक

हस्ते :- रामगोपाल बिदावतका

सही :

श्री. ज्योती जीवन हिरे
स्टॅम्प वेंडर, नाशिक
म नि प क ७/९६

TREASURY OFFICE NASIK
21 NOV 2017
STPHC ATO

सदरचा स्टॅम्प अल्ट्रा व्हायलेट लॅम्प खाली तपासला.

सह. दुय्यम निबंधक वर्ग-२
नाशिक-५.

नसन-५
दस्त क्र. ६९५६ /२०१७
९३ - ८२

SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR Class-2 NASIK-5
सह. दुय्यम निबंधक वर्ग-२ नाशिक-५

## जनरल मुखत्यारपत्र

जनरल मुखत्यारपत्र आज दिनांक 11 माहे डिसेंबर इसवी सन 2017 रोज ते दिवशी नासिक मुक्कामी :-

जा.मुद्रांक

नसन – ५
दस्त क्र. ६९८ /२०१७
२ — २२

24 NOV 2017

मुद्रांक विक्रेत्याचे नांव : श्री. ज्योती जीवन हिरे
स्टॅम्प वेंडर नाशिक
पावती क्रमांक
श्री. / श्रीमती सुंगठा होम्स मल.मल.पी
राहणार पेठनगररोड, नाशिक यांच्याकडून त्यांचेसाठी / त्यांच्या वतीने
श्री. / श्रीमती रामगोपाल बिदावतका
राहणार यांच्यासाठी रूपये ५००/- (अक्षरी रूपये पाचशे मात्र) खाली नमूद केलेल्या मुद्रांक खरेदीसाठी रोख मिळाले.

| रजि.मधील अ.क्र. | मुद्रांकाचा अनुक्रमांक व मुद्रांकाचा तपशिल | संख्या | किंमत रूपये |
|---|---|---|---|
| ९०७७ | ५००×१ AC798995 | १ | ५००/- |
| | एकूण | | ५००/- |

(मुद्रांक विकत घेणाऱ्याची सही) (मुद्रांक विक्रेत्याची सही)

टिप : एका व्यवहारासाठी रू. १५,०००/- पेक्षा जास्त किंमतीचे लागणारे मुद्रांक शुल्क कोषागार कार्यालयातून घ्यावेत.

SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR Class-2 NASIK-5

SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR Class-2 * NASIK-5 *

नसन-५
दस्त क्र. ६८८५ /२०१७
३ — २२

| | |
|---|---|
| **रूंग्ठा होम्स एल.एल. पी.**<br>अ, एल.एल.पी. रजिष्टर्ड अंडर द लिमिटेड लायबिलीटी<br>पार्टनरशिप ॲक्ट 2008 जिचे कार्यालय<br>Pan No.:-AAUFR4502 Q<br>श्री. तिरूमाला, आशीर्वाद अपार्टमेंट, पेंठेनगर, रोड, इंदिरा<br>नगर, नाशिक - 422009 तर्फे भागीदार<br>**श्री अखिल ललीत रूंग्ठा**<br>उ.व.-29 व्यवसाय :- व्यापार | **लिहून घेणार** |

:: <u>यांसी</u> ::

| | |
|---|---|
| **मे. सुराणा ॲण्ड सन्स भागीदारी संस्था**<br>जिचे कार्यालय - अगोरा कॉम्पलेक्स, कॅनडा कॉर्नर, नाशिक<br>Pan No.:-AAVFS4807N<br>तर्फे भागीदार<br>**श्री श्रेणिक शशिकांत सुराणा**<br>उ.व. :-39 धंदा :- व्यापार | **लिहून देणार** |

**जनरल मुखत्यारपत्र लिहून देतो ऐसा जे की :-**

1. मिळकतीचे वर्णन अ) तुकडी जिल्हा नासिक पोटतुकडी तालुका नासिक महानगरपालिका हद्दीतील, नागरी जमीन कमाल मर्यादा कक्षेतील, **मौजे नाशिक** या गांवचे शिवारातील नाशिक महानगरपालिकेच्या मंजूर विकास आराखड्यातील रहीवासी विभागातील बिनशेती प्लॉट मिळकत यांसी सर्व्हे नं.807/1/2/5 ते 7 **ह्या मंजूर लेआऊटमधील प्लॉट नं.** 1 सी + 2 / ए ह्यांसी क्षेत्र 3998.00 चौ. मी., यांसी चतु:सीमा येणेप्रमाणे :-

| | | |
|---|---|---|
| पूर्वेस | : | ओपन स्पेस व प्लॉट नं. 1सी + 2 / ब |
| पश्चिमेस | : | प्लॉट नंबर 1 ब |
| दक्षिणेस | : | 12 मी. रोड |
| उत्तरेस | : | लागू सर्व्हे नं. 806 / 2 ब / 1 ची मिळकत. |

येणेप्रमाणे चतु:सीमेतील जल, तरू काष्ट, पाषाण निधी, निक्षेप, झाड झाडोऱ्यासह, तदंगभुत वस्तुंसह जाणे - येण्याचे वागवहिवाटीचे हक्कांसह दरोबस्त प्लॉट मिळकत.

2. प्रस्तुतचे जनरल मुखत्यारपत्रात लिहून देणार यांना आम्ही व लिहून घेणार यांना तुम्ही असे संबोधिले आहे. येणेप्रमाणे वर कलम 1 यात वर्णन केलेल्या प्लॉट मिळकती पैकी प्लॉट नंबर 1 सी यांसी क्षेत्र 3435.50 चौ.मी. हे लिहून देणार यांनी झिल इन्फ्राप्रोजेक्टस् प्रा.लि. व सन इन्फ्रास्ट्रक्चर्स प्रा.लि. यांचेकडून रजिस्टर खरेदीखताने खरेदी घेतलेली मिळकत आहे. सदरचे खरेदीखत मे. दुय्यम निबंधक साहेब नाशिक - 3 यांचे कार्यालयात अनुक्रमांक 1743 तारीख 20-03-2017 रोजी नोंदविण्यात आलेले आहे.सदरच्या खरेदीनुसार मिळकतीचे रेकॉर्डला 400215 नुसार लिहून देणार यांचे नावाची नोंद झालेली आहे.

SEAL OF THE ... R Class-2 * NASIK-5 *
नासक ५
दस्त क्र.( ८-९६५ /२०१७)
८ — ९२

3. तसेच वर कलम 1 यात वर्णन केलेल्या प्लॉट मिळकती पैकी प्लॉट नंबर 2 यांसी क्षेत्र 2234.50 चौ.मी. पैकी 562.5 चौ.मी. क्षेत्र लिहून देणार यांनी झिल इन्फ्राप्रोजेक्टस् प्रा.लि. व सन इन्फ्रास्ट्रक्चर्स प्रा.लि. यांचेकडून रजिस्टर खरेदीखताने खरेदी घेतलेली मिळकत आहे. सदरचे खरेदीखत मे. दुय्यम निबंधक साहेब नाशिक - 3 यांचे कार्यालयात अनुक्रमांक 5142 तारीख 26-07-2017 रोजी नोंदविण्यात आलेले आहे.सदरच्या खरेदीनुसार मिळकतीचे रेकॉर्डला 400232 नुसार लिहून देणार यांचे नावाची नोंद झालेली आहे.

4. सदरच्या सर्व्हे नं. 807/1/2, सर्व्हे नं. 807/1/5, सर्व्हे नं. 807/1/6, सर्व्हे नं. 807/1/7, असे एकूण क्षेत्र 22600.00 चौ.मी. ह्या क्षेत्रासाठी लेआऊट बनविलेला असून सदरचा लेआऊट हा नाशिक महानगरपालिकेचे तारीख 27/09/2016 रोजीचे पत्र नं. नामनपा/ न.र.बि.-5 /16/ 2016 अन्वये तात्पुरता मंजुर केलेला आहे. उपरोक्त हिश्यापैकी 807/1/5 ह्या मिळकतीचे संपूर्ण क्षेत्र 400.00 चौ.मी व सर्व्हे नंबर 807/1/7 ह्या मिळकतीचे संपूर्ण क्षेत्र 700 चौ.मी. असे एकूण 1100 चौ.मी. क्षेत्र हे 18 मी. डी.पी. रोड कडे आरक्षित असून सदरचे आरक्षित क्षेत्राचे खरेदीखत नाशिक महानगरपालिका नाशिक यांना तारीख 16/12/2016 रोजी रजिष्टर खरेदीखताने खरेदी दिलेले असून सदरचे खरेदीखत मे. दुय्यम निबंधक साहेब, नाशिक -5 यांचे कार्यालयात अनुक्रमांक 7377 दिनांक 16/12/2016 रोजी नोंदविण्यात आलेले आहे. सदरची मिळकत ही मे. जिल्हाधिकारी साहेब नाशिक यांचेकडील बिनशेती आदेश नंबर क्र. मह / कक्ष - 3 / 4 / बि.शे.प्र.क्र. /80 / 2009 नाशिक, दिनांक 24/02/2010 नुसार कायमची बिनशेतीकडे वर्ग झालेली आहे. सदर मिळकतीचे बाजूस असलेल्या नाल्याचे बांधकाम पुर्ण करून नाशिक महानगरपालिकेकडून त्यांचेतारीख 21/10/2016 रोजीचे पत्र नं. भुगयो/वशि/562/2016 अन्वये बांधकाम पुर्ण झाल्याचा दाखला घेतलेला आहे. तसेच सदर मिळकतीचा लेआऊट अभिन्यास मे.असिस्टंट डायरेक्टर ऑफ टाऊन प्लॅनिंग, नाशिक महानगरपालिका नाशिक यांनी त्यांचेकडील पत्र क्रमांक जा. नं. /नगररचना विभाग / अंतिम / ओ-4/ 2016 दिनांक 23/12/2016 अन्वये अंतिमरित्या मंजूर केलेला आहे. सदरच्या मंजुर लेआऊट नुसार प्लॉटचे स्वतंत्र 7/12 उतारे नोंद नं. 400045 नुसार करण्यात आलेली आहे.

5. सदर प्लॉट नं. 1 सी यांसी क्षेत्र 3435.50 चौ.मी. व प्लॉट नं. 2 यांसी क्षेत्र 2234.50 चौ.मी. यांचा भूखंड एकत्रिकरण व उपविभाजन नकाशा तयार करुन तो सहय्यक संचालक नगररचना नाशिक महानगरपालिका नाशिक यांचेकडील पत्र क. जा. क नरवि / वशि / बी -5 / 22 /2017 , दिनांक 26/09/2017 नुसार मंजूर करुन घेतलेला आहे. सदरच्या मंजूर भूखंड एकत्रिकरण व उपविभाजन नकाशा नुसार प्लॉट नं. 1सी + 2 / ए यांसी क्षेत्र 3998.00 चौ.मी. ही प्लॉट मिळकत लिहून देणार यांचे कब्जेवहीवाटीत व उपभोगात मालकी हक्काने आहे.

6. येणेप्रमाणे सदरची मिळकत ही लिहून देणार यांचे कब्जेवहिवाटीत व उपभोगात मालकी हक्काने आहे . सदरची मिळकत लिहून देणार ह्यांची मालकीची असल्याने तिची विल्हेवाट लावण्याचा त्यांना संपूर्णपणे हक्क व अधिकार आहे. येणेप्रमाणे सदरची मिळकत आमचे प्रत्यक्ष कब्जावहिवाटीत व उपभोगात मालकी हक्काने आहे. सदरच्या मिळकतीची पाहिजे तशी विल्हेवाट लावणेचा व उपभोग घेण्याचा आम्हास पूर्ण हक्क व अधिकार आहे.सदरची मिळकत आम्हांस डेव्हलप करावयाची असून त्याप्रमाणे मिळकत डेव्हलप करणे, त्यासाठी हर एक प्रकारची कामे

SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR Class-2 * NASIK-5 *
दुय्यम निबंधक वर्ग-२, नाशिक-५

नसनं-५
दस्त क्र. २६६६ /२०१०
५ — ३२

करणे, तसेच प्लॉटचे अथवा बांधीव भागाचे खरेदीखताचे वेळेस वेळोवेळी हजर रहाणे आम्हांस शक्य नाही. म्हणून वर वर्णन केलेल्या मिळकती संबंधाने डेव्हलपमेंटबाबत खालीलप्रमाणे कामे करणेकरीता तसेच सदर मिळकत व त्यावरील बांधीव भाग यांचे खरेदीखत एकत्र अथवा स्वतंत्रपणे आमचे करीता व आमचे वतीने लिहून देण्यासाठी मुखत्यार तुम्हांस नेमावयाचे ठरवले व तुम्हासच आमचे जनरल मुखत्यार म्हणून पसंत करून प्रस्तुतचे मुखत्यार पत्र तुमचे लाभांत लिहून दिले आहे. तुम्ही आमचे करीता व आमचे वतीने खालीलप्रमाणे कामे करावीत. तुम्ही केलेली कामे व लिहून दिलेले दस्तऐवज आम्हांस कबूल व मंजूर राहतील व ती आम्ही केव्हाही नाकारणार नाही. खालीलप्रमाणे कामे करतांना तुम्ही हर एक ठिकाणी हर एक कागदपत्रांवर आमचे करीता व आमचे वतीने सहया कराव्यात. तुम्ही स्वतः केलेली कामे आम्ही स्वतः हजर राहून केलेली आहेत असे समजून ती आमचेवर बंधनकारक राहतील. प्रस्तुतचे मुखत्यारपत्र आमचेवर व आमचे वारसांवर देखील बंधनकारक आहे व राहील. सदर मिळकतीकरीता लिहुन देणार यांनी लिहुन घेणार याचे लाभात विकसन करारनामा लिहुन वनोंदवून दिलेले आहे. सदरच्या विकसन करारनाम्यातील अटी व शर्तींना अधिन राहून प्रस्तुतचे मुखत्यारपत्र लिहुन व नोंदवून देत आहोत. सदरचे मुखत्यारपत्र हे लिहून घेणार भागीदारी संस्थेतर्फे भागीदार हे एकत्रित अथवा स्वतंत्ररित्या वापरु शकतील सदरच्या भागीदारी संस्थेच्यावतीने कोणीही एक भागीदार सदर मुखत्यारपत्रानुसार प्राप्त हक्क व अधिकाराचा वापर करु शकतील.

**<u>सदर मुखत्यार पत्रान्वये लिहुन घेणार यांना खालील हक्क व अधिकार दिलेले आहेत.</u>**

१. उपरोक्त मिळकतीची मोजणी करणे, त्यासाठी अर्ज देणे, त्यावर सहया करणे, मोजणी फी भरणे, मोजणीचे वेळी समक्ष हजर रहाणे, मोजणी कबूल करणे, मिळकतीच्या हद्दी कायम करणे, मोजणी नकाशावर सही करणे वगैरे सर्व कामे करणे.

२. सदर मिळकतीचा बिनशेती कराधी भरणा करणे.

३. सदरील वर नमूद बांधीव मिळकतीची तिन्हाईत इसमांना विक्री करणेसाठी गिन्हाईक पाहणे, त्याच्यांशी किंमतीबाबत बोलणी करणे. किंमत निश्चित करणे. त्यानुसार करारनामा, साठेखत, खरेदीखत, जनरल मुखत्यारपत्र, विकसन करारनामा आपणांस मिळकतीचे हस्तांतराकामी आवश्यक ते दस्त लिहून देणे त्यावर सह्या करणे. किंमतीचा भरणा स्विकारणे, कबुली जबाब देणे, दस्त कबुल करणे, सदरचा दस्त मे. दुय्यम निबंधक साहेब ह्यांच्या कार्यालयात नोंदवून देणे . मिळकतीचा कब्जा खरेदीदारांना देणे. खरेदीदारांची नावे मिळकतीच्या रेकार्डला लावणे व त्या अनुषंगाने करावी लागणारी सर्व कामे करणे.

४. वर नमुद केलेल्या मिळकतीवर जागेवर असलेल्या क्षेत्राकरीता उपलब्ध व भविष्यात उपलब्ध होणारा एफ.एस.आय. वापरुन , टी.डी.आर. उपलब्ध झाल्यास तो अथवा खरेदी करुन तो वापरुन इमारत नकाशा बनविणे, त्यावर सहया करणे, सदर इमारत नकाशा मंजूरीसाठी सादर करणे, आर्कीटेक्ट नेमणे, नकाशा मंजूरीकामी आवश्यक ते कागदपत्र दाखल करणे, इतर सर्व कामे करणे, त्यानुसार इमारत नकाशे मंजूर करुन घेणे, त्यासाठी डेव्हलपमेंट चार्जेस , बेटरमेंट चार्जेस

SEAL OF THE ... NASIK-5 ... AR Class-2
दस्त क्र.( ६२८५ /२०१३)
५ — ९२

...करणे, कमेन्समेंट सर्टिफिकेट घेणे, तसेच इमारत नकाशा मंजूरीची मुदतवाढ घेणे, त्यासाठी अर्ज देणे, समक्ष हजर रहाणे, इमारत बांधकाम पूर्ण झाल्याचा दाखला घेणे, त्यासाठी रकमा भरणे, अर्ज देणे, कागदपत्रांवर सह्या करणे.

5. सदर मिळकतीवर इमारत नकाशे मंजूर झालेनंतर त्यानुसार सदरहू मिळकतीवर बांधकाम करणे, डेव्हलपमेंट करारातील अटी व शर्तीनुसार वेळोवेळी उपस्थित होणारी, आवश्यक वाटणारी सर्व कामे करणे, वर्तमान पत्रात जाहीरात देणे, आवश्यक ते करार लिहून देणे, डेव्हलपर कॉन्ट्रॅक्टर नेमणे, व त्यासाठी आवश्यक त्या कार्यालयाकडे अर्ज देणे, सहया करणे, समक्ष हजर रहाणे, पत्रव्यवहार करणे, वगैरे कामे करणे.

6. वर नमुद केलेल्या मिळकतीवर मंजूर इमारत नकाशान्वये बांधकामाची विक्री करणे, इच्छुक ग्राहकांबरोबर वाटाघाटी करणे, किंमत ठरविणे, साठेखत करारनामा लिहून देणे, खरेदीखत लिहून देणे, त्यासाठी रक्कम स्विकारणे, पावत्या देणे, करारनामे, खरेदीखत मे. दुय्यम निबंधक साहेब यांचे कार्यालयात हजर करणे, करारनामा व खरेदीखत नोंदविणे, नोंदणी कबुल करणे, मिळकतीचा कब्जा देणे, कब्जा पावतीवर सही करणे, तसेच त्या अनुषंगाने मिळकतीचे खरेदीखत करुन देणे, खरेदीखताचा मसुदा तयार करणे, मिळकतीची किंमतीची रक्कम स्विकारणे, सदरचे खरेदीखत मे. दुय्यम निबंधक साहेब,नासिक यांचे कार्यालयात हजर करणे, भरणा मिळाल्याचे कबूल करणे, तसेच खरेदीदारांची मालकी हक्कात नांवे लागण्यासाठी आवश्यक ती सर्व कार्यवाही करणे.

7. सदर मिळकतीवर अथवा संदरचा प्रकल्प तारण ठेवून तुम्ही वित्तीय संस्थेकडून कर्ज घेऊ शकता. त्याकामी गहाणखत व अन्य आवश्यक ते दस्त वित्तीय संस्थेचे लाभात लिहुन व नोंदवून देऊ शकतात. तुम्ही बांधणार असलेल्या इमारतीतील नियोजीत खरेदीदारांना ते खरेदी करणार असलेली जागा तारण ठेऊन बँकेकडून, खाजगी संस्थांकडून / इसमांकडुन अथवा कोणत्याही वित्तीय संस्थेकडून कर्ज घ्यावयाचे असल्यास त्यासाठी संमती देणार म्हणून सहया किंवा संमत्या देणे, त्यासाठी समक्ष हजर रहाणे, व इतर तत्सम कामे करणे, त्या कामी आवश्यक त्या सर्व कागदपत्रांची पूर्तता करणे.

8. इमारतीचे बांधकाम पूर्ण झाल्यावर स्कीममधील इमारत फ्लॅट धारकांची त्यांनी तयार केलेली सहकारी गृहनिर्माण संस्थेचे, कंपनीचे, किंवा असोसिएशन ऑफ अपार्टमेंट ओनर्स चे नांवे किंवा अन्य कार्पोरेट बॉडीचे नांवे मिळकत तबदील करणेचा, त्यासाठी आवश्यक ते कागदपत्र, दस्तऐवज लिहून देणे व इतर तत्सम कामे करणे, त्यासाठी डिक्लरेशन ऑफ अपार्टमेंट, डीड ऑफ अपार्टमेंट खरेदीखत, भाडेपट्टा वगैरे लिहुन देणे, सदरच्या दि महाराष्ट्र ओनरशिप अपार्टमेंट ॲक्ट 1970 चे तरतुदीनुसार व नियम याखाली आवश्यक ते डीड ऑफ डिक्लरेशन बनवणे व त्या डिक्लरेशन मध्ये सामायिक जागा व राखीव जागा जाहीर करण्याकरीता आवश्यक ते तपशिल, नकाशे देणे तसेच मिळकतीसंदर्भाने डिक्लरेशन करीता आवश्यक ती सर्व माहिती, अटी व शर्ती नमुद करणे, रेकॉर्ड दुरुस्त करणे व कायद्यानुसार आवश्यक ती सर्व कामे करणे.

9. उपरोक्त मिळकतीचे मालकी हक्काबाबत, कब्जाबाबत, हद्दीबाबत चतुःसीमेबाबत अगर अन्य कुठल्याही कारणोस्तव वाद उत्पन्न झाल्यास त्याचे निवारण करणे, आवश्यकता भासल्यास

SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR Class-2 * NASIK-5 *

नसल-५
दस्त क्र. ६८५४ /२०१३
७ — २२

त्यासाठी दिवाणी, फौजदारी, रेव्हेन्यू अगर अन्य कुठल्याही कोर्टात दावा दाखल करणे, त्यावर सहया करणे,कोर्टात समक्ष हजर रहाणे, जाब जबाब देणे, तोंडी पुरावा देणे, तसेच उपरोक्त मिळकतीसंबंधाने आमचे वर दावा, दावे दाखल झाल्यास त्याचे समन्स, नोटीस, रिटस स्विकारणे, कोर्टात समक्ष हजर रहाणे, कैफियत देणे, तसेच कैफियत घेणे, प्रतिज्ञापत्र करणे, सहया करणे, पुरावा देणे, कागदपत्र हजर करणे, बचाव करणे, तसेच कनिष्ठ न्यायालयाचे हुकुमाविरुध्द वरीष्ठ न्यायालयात अपिल दाखल करणे, आपिल मेमोवर सहया करणे, वगैरे सर्व कामे करणे व सदर कोर्ट कारवाई कामे अव्वलचे कोर्टापासून अखेरचे कोर्टापावेतो पूर्व पक्ष अगर उत्तर पक्ष म्हणून हजर राहून कारवाईचा अंतिम निकाल लावून घेणे, वकीलपत्रांवर सहया करणे, वकील फी देणे, उपरोक्त कोर्ट कारवाई, कामी मिळालेल्या हुकुमनाम्यानुसार दरखास्त दाखल करणे, त्यावर सही करणे, कब्जा वारंटस मिळविणे, कब्जा घेणे, कब्जा पावती लिहून देणे व घेणे, वगैरे सर्व कामे करणे.

10. सदर मिळकतीमध्ये विजेचे तात्पुरते,कायमचे कनेक्शन मिळविण्यासाठी महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाचे नियमानुसार डिपॉझिट भरणे, टेस्ट वायरिंग, रिपोर्ट सादर करणे व कनेक्शन मिळविण्यासाठी आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता करणे, आवश्यक आहे त्या सर्व कागदपत्रांची व गोष्टींची पूर्तता करणे मिळकतीमध्ये बांधकाम पूर्ण झाल्यानंतर प्रत्येक सदनिका धारकांच्या नावाने वेगवेगळे विजेचे कनेक्शन मिळविण्यासाठी वर वर्णन केलेली सर्व कामे करणे, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाकडून डिपॉझिटची रक्कम परत मिळविणे असल्यास त्यासाठी अर्ज करणे. विजेचे कनेक्शन मिळाल्यानंतर वेळोवेळी विजेची बीलें भरणे, सर्व कायदेशीर बाबींची व गोष्टींची पूर्तता करुन देवून डिपॉझिट परत मिळवणे.

11. उपरोक्त मिळकतीमध्ये पाण्याचे कनेक्शन मिळवणेसाठी संबंधीत कार्यालयाकडे, नासिक महानगरपालिकेकडे अर्ज करणे, अनामत रक्कम भरणे, कनेक्शन फी भरणे, नासिक महानगरपालिकेचे नियमानुसार आवश्यक त्या सर्व गोष्टींची पूर्तता करणे, व कनेक्शन मिळविणे.

12. उपरोक्त मिळकत विकसीत झालेनंतर प्लॉट मिळकतीची व बांधकामाची विक्रीसाठी ज्या वेळी जरुरी असेल त्या वेळी आमचे वतीने आवश्यक त्या परवानग्या मिळविणे, त्या कामी अर्ज ॲफिडेव्हीट देणे, सर्व दस्तऐवजांची पूर्तता करुन देणे, जबाब देणे, इतर माहिती देणे.

13. सदरच्या बांधकामाची ट्रान्सफर ऑफ प्रॉपर्टी ॲक्टमध्ये नमुद केलेले कोणत्याही प्रकारचे हस्तांतरण करणे, त्यासाठी आवश्यक असलेले दस्तऐवज लिहून देणे, त्यावर भरणा स्विकारणे, मिळकतीचा कब्जा देणे जरुरी असल्यास सदरचे दस्तऐवज मे. सब रजिस्ट्रार साहेब यांचे कडे नोंदणीसाठी हजर करणे, ते लिहून दिल्याचे कबूल करणे, पावत्या देणे, त्यासाठी जरुरी असलेली सर्व कामे करणे, परवानग्या, नो ऑब्जेक्शन, क्लिअरन्स सर्टिफिकेटस इत्यादी मिळविणे.

14. खरेदीखतानंतर मिळकतीचे रेकॉर्ड ऑफ राईटसला खरेदीदारांची नांवे लागणेसाठी नासिक महानगरपालिकेकडे व संबंधीत कार्यालयाकडे / तलाठ्याकडे जरुर ते सर्व अर्ज करणे, त्यावर सहया करणे,कागदपत्रे दाखल करणे, व नांवे लावणे .

15. मिळकत हस्तांतर करतांना केलेल्या दस्तऐवजात चुका झाल्यास त्यासाठी जरुर ते चुक

SEAL OF THE ... NASIK-5 * Class-2
दस्त क्र. ८२८४ /२०१७
८ — ३२

दुरुस्ती लेख लिहून देणे तसेच ते लेख रजिस्टर करणेसाठी जरुर असलेल्या सर्व कामांची पूर्तता करणे .

16. सदर मिळकतीवरील सर्व प्रकारचे कर व महसुलांच्या रकमेचा भरणा करणे.

17. वरील सर्व कामांसाठी वकील, प्लीडर व अन्य व्यक्तींची नेमणुक करणे.

18. कोणत्याही कारवाईत तडजोड करणे किंवा काढून घेणे, किंवा लवादाकडे निर्णयासाठी सोपविणे.

19. हे मुखत्यारपत्र करुन देतांना आम्हांला या गोष्टींची जाणीव आहे की आमचे मुखत्यारांना दिलेल्या अधिकारांमुळे त्यांनी आमचे वतीने व आमचे साठी केलेली सर्व कामे व कायदेशीर कृत्ये आम्हीच केलेली आहेत असे समजण्यात येईल व या मुखत्यार पत्रात आम्ही अशी हमी देतो की आमचे मुखत्यारांना दिलेल्या अधिकारान्वये जी जी कामे ते करतील ती ती आम्हास मान्य व कबुल असतील व ती आमचेवर बंधनकारक राहतील .तथापि आम्हांला सदरचे मुखत्यार पत्र रद्द करण्याचे असल्यास त्यासाठी सक्षम दिवाणी न्यायालयाचा अंतिम हुकुम मिळविल्याशिवाय ते करता येणार नाही याची आम्हांला जाणीव आहे.

20. तसेच वरील सर्व हक्क व अधिकार व्यतिरिक्त वेळोवेळी भविष्यात डेव्हलपमेंट कामी जी जी कार्यवाही करावी लागेल अगर जी जी कामे करावी लागतील ती ती सर्व कामे करणेसाठी तुम्हास मुखत्यारपत्र दिलेले असल्याने मिळकतीचे डेव्हलपमेंट साठी अर्जावर ॲफिडेव्हीटवर, दस्तऐवजांवर सहया करणे, जबाब देणे, सदर कामे ही जरी प्रस्तुतचे जनरल मुखत्यारपत्रात लिहीलेली नसली तरीही सदर जनरल मुखत्यार पत्रान्वये सदर कामे करण्यासाठी हक्क दिलेले आहेत असे समजण्यात येईल.

21. सदरचे मुखत्यारपत्र हे दिनांक 11 /12/2017 रोजीच्या डेव्हलपमेंट करारानाम्याचे शर्तीस अधीन राहून लिहून देणार यांनी लिहून दिलेले आहे. सदरचे मुखत्यार पत्र हे मोबदल्याचे पोटीचे (इर्रिव्होकेबल) स्वरुपाचे मुखत्यारपत्र आहे. सदरचे मुखत्यारपत्र हे कराराचे शर्तीनुसार व डेव्हलपमेंट करारनाम्यानुसार ठरलेल्या व्यवहाराचे पोटी देण्यात आलेले असून सदरचे मुखत्यार पत्र व उपरोक्त करारनामा हे एकाच व्यवहाराचे संबंधीचे दोन दस्तऐवज आहेत व त्यामुळे सदरचे दस्ताचे नोंदणीसाठी अलाहिदा स्टॅम्प लावून देण्याची आवश्यकता नाही.सदरचा विकसन करारनामा मे. दुय्यम निबंधक साहेब नाशिक - 5 यांचे कार्यालयात अनुक्रमांक 6985 तारीख 11/12/2017 नुसार नोंदविला आहे.

हे जनरल मुखत्यारपत्र राजीखुशीने स्वसंतोषाने, समजून उमजून कोणत्याही दडपणाला बळी न पडता लिहून दिले असून त्याचे साक्षीसाठी आज रोजी नाशिक मुक्कामी आम्ही या दस्तावर सहया केल्या आहेत.

| नसनं क्र. ५ |
|---|
| दस्त क्र. ६६८५ /२०१७ |
| ९ / २२ |

हे जनरल मुखत्यारपत्र.

नासिक .

तारीख :-14 12 /2017.



रूंग्ठा होम्स एल.एल. पी.
तर्फे भागीदार
श्री अखिल ललीत रूंग्ठा

लिहून घेणार



मे. सुराणा ॲण्ड सन्स भागीदारी संस्था
तर्फे भागीदार
श्री श्रेणिक शशिकांत सुराणा

लिहून देणार

1. ............................ 2. ............................

Ram Gopal Beniwal साक्षीदार K.V. Singh

SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR Class-2 * NASIK-5 *

नसनन-५

दस्त क्र. ८२८५ /२०१७

१—२२

हे जनरल मुखत्यारपत्र.

नासिक .

तारीख :-11/ 12 /2017.



रूंग्ठा होम्स एल.एल. पी.
तर्फे भागीदार
श्री अखिल ललीत रूंग्ठा

लिहून घेणार



मे. सुराणा ॲण्ड सन्स भागीदारी संस्था
तर्फे भागीदार
श्री श्रेणिक शशिकांत सुराणा

लिहून देणार

1. ..................................... 2. .....................................

Ram Gopal Beslwal साक्षीदार K.V. Singh

SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR Class-2 * NASIK-5 *